# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २६२/२०२४ दिनांक:- १६/०७/२०२४.

## “कारची काच तोडुन बॅग लिप्टींग करुन रोख रक्कम चोरी करणा-या सराईत आंतरराज्य टोळीला अटक करण्यात पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश”

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०१/०७/२०२४ रोजी दुपारी ०१.१० वा.सुमारास धानीव बाग येथील मारुती सुझीकी शोरुम समोर चालु असलेल्या नवीन इंडस्ट्रीयल गाळया समोर, नालासोपारा पूर्व ता.वसई जि.पालघर येथे यातील फिर्यादी यांनी त्यांची महेंद्र स्कॉर्पिओ कार क्रमांक एम.एच.४८/सी.टी. ४४४६ ही उभी करुन इंडस्ट्रीयलचे नवीन बांधकाम चालु असलेल्या कामाचे ठिकाणी गेले असताना फिर्यादीचे कारचे पाठीमागील सिटवर ठेवलेली लेदरची बॅग व त्यात असलेले बुक,आरसीबुक व रोख रक्कम कोणीतरी अज्ञात चोरटयाने कारचे डावे बाजुचे पाठीमागील दरवाजाची काच फोडुन चोरी करुन घेवुन गेले बाबत फिर्यादी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पेल्हार पोलीस ठाणे येथे दिनांक ०१/०७/२०२४ रोजी २२.०८ वा गुन्हा रजि.क्र. I ५७४/२०२४ भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम ३०५ (सी) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत अशा प्रकारचे गुन्हे वारंवार होत असल्याने वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना गुन्हा उघडकिस आणुन आरोपीतांना अटक करण्याच्या सुचना दिल्या. गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ सदर गुन्हयाचे घटनास्थळाला भेट देवुन परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. त्यामध्ये सदर आरोपीत हे रस्त्यात उभी असलेल्या कार मध्ये बॅग ठेवलेली असल्यास चाकुचे सहाय्याने गाडीचे टायर पंक्चर करुन कारचे दरवाजाची काच गुल्लर व लोखंडी छ-याने तोडुन बॅग घेवुन पळुन जात असल्याचे निदर्शनास आले. घटनास्थळा वरील सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक माहीतीचे आधारे घटनास्थळ ते वापी गुजरात यादरम्यानचे असंख्य सीसीटीव्ही फुटेज पाहुन सदरचा गुन्हा करणारे आरोपीत यांची माहिती प्राप्त करुन सदर आरोपीत हे दिनांक १०/०७/२०२४ रोजी नालासोपारा पूर्व येथील सोपारा फाटा येथे पून्हा येणार असल्याची माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी पंचासह सापळा रचुन आरोपी नामे - १) कार्तिक बाळु नायडु, वय २३ वर्षे, सध्या रा. गुलाबनगर, वापी गुजरात, मुळ रा. मु.पोस्ट करंजीया, वाकीपाडा, ता. नवापुर, जि. नंदुरबार, २) रामु पावनआसम तुट्टीनायकर, वय ४० वर्षे, रा. रा. गुलाबनगर, वापी गुजरात, मुळ रा. ग्राम रावतामेळ, तहसिल तुवागुडी, जि. त्रिचनापल्ली, राज्य तमिळनाडु, ३) सुब्रमनी रामु नायडु, वय ५० वर्षे, रा. गुलाबनगर, वापी गुजरात, मुळ रा. ग्राम तिळुमपुर, १३ नंबर, जि. त्रिचनापल्ली, राज्य तमिळनाडु ४) एक विधीसंघर्षीत बालक यांना ताब्यात घेतले. सदर गुन्हयाचे पुढील तपासकामी विधिसंघर्षित बालक यांस भिवंडी बाल सुधारगृह येथे जमा करण्यात आले असुन आरोपीत यांचेकडुन गुन्हा करण्याकरीता वापरण्यात येणारे दोन गुल्लर, छरे व लहान चाकु तसेच गुन्हयात चोरीस गेलेली रोख रक्कम व कागदपत्रे हस्तगत करण्यात आली आहे. आरोपीत यांचे कडुन एकूण २०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आले आहे.

**सदर आरोपीत यांचे कडुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकिस आले आहे.**

| अ.नं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि. नं. व कलम |
|---|---|---|
| १ | पेल्हार पोलीस ठाणे | गु.र.क्र. ५७४/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३०५ (सी) प्रमाणे **(मुळ गुन्हा)** |
| २ | पेल्हार पोलीस ठाणे | गु.र.क्र. १९३/२०२४ भा.द.वि.स कलम ३७९ प्रमाणे |
| ३ | पेल्हार पोलीस ठाणे | गु.र.क्र. ५६५/२०२४ भा.द.वि.स कलम ३७९ प्रमाणे |
| ४ | मांडवी पोलीस ठाणे | गु.र.क्र. १६९/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३०३(२),३(५) प्रमाणे |

सदर आरोपीत यांचे विरुध्द **मध्यप्रदेश व गुजरात राज्य** येथे गुन्हे दाखल आहेत. सदर आरोपीत यांनी काशीमिरा, मिरारोड, वसई येथे गुन्हे केले असल्याचे त्यांनी सांगितलेले आहे. तरी आपल्या पोलीस ठाण्यात अशा प्रकारचे गुन्हे दाखल असल्यास सदर आरोपीत यांचा मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ५ वे न्यायालय वसई येथुन ताबा घेण्यात यावा.

सदरची कामगिरी श्री. जयंत भजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. शकील शेख, पोलीस निरीक्षक (प्रशासन) पेल्हार पोलीस ठाणे, पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/सोपान पाटील, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, वाल्मीक पाटील, पो.अं./रवि वानखेडे, निखील मंडलिक, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अभिजित नेवारे, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

----------oooooo----------